**पोलीस अधीक्षक कार्यालय,जळगाव**

फोन ०२५७-२२२१७९० फॅक्स ०२५७-२२२०५११

**Email ID:-**sp.jalgaon@mahapolice.gov.in


जनसंपर्क अधिकारी
दि.१ ६/०७/२०२६.

## -: जळगाव स्थानिक गुन्हे शाखेची मोठी कारवाई :-

## " धावत्या बसमध्ये बॅग लिफ्टींग करणारे स्थानिक गुन्हे शाखेच्या ताब्यात."

| पोलीस ठाणे | गु.र.नं. व कलम | रिपोर्ट देणारे |
|---|---|---|
| एम.आय.डी.सी.पो.स्टे. | 00/2026, भा.न्या.सं.क. 305(क) प्रमाणे. | पो.उप.निरी.दिपक जगदाळे स्थानिक गुन्हे शाखा, जळगांव. |
| **माहिती कशी प्राप्त झाली** | **गुन्हा दाखल तारीख व वेळ** | **गुन्हा उघड तारीख** |
| तांत्रिक व गोपनिय | दि.15/07/2026 रोजी 20.54 वा. | दि.16/07/2026. |

**गुन्हे उघडकीस आणणारे पोलीस अधिकारी व अंमलदार.**

मा.श्री.श्रीकांत धिवरे, पोलीस अधीक्षक, जळगांव.
मा.श्री.संदिप गावीत, अपर पोलीस अधीक्षक,जळगांव परिमंडळ.
मा.श्री.नितीन गणापुरे, उपविभागीय पोलीस अधिकारी,जळगांव उपविभाग, जळगांव.
यांचे मार्गदर्शनाखाली
श्री.राहुल गायकवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा,जळगांव.
पो.उप.निरी.दिपक जगदाळे, पो.उप.निरी.संतोष पवार, सहा.फौज.अतुल वंजारी, पो.हे.कॉ.अक्रम शेख, विजय पाटील, मुरलीधर धनगर, प्रविण भालेराव, किशोर पाटील आणि पो.अ.राहुल रगडे, प्रदिप सपकाळे, रवींद्र कापडणे, छगन तायडे सर्व नेम.स्थानिक गुन्हे शाखा,जळगांव. तांत्रिक विश्लेषण विभागातील पो.अ.गौरव पाटील, मिलींद जाधव, नेत्रम विभागातील-पोअ.मुबारक देशमुख, पे.अ.पंकज खडसे, पो.अ.कुदनसिंग बयास.

| | |
|---|---|
| **आरोपीचे नांव व पत्ता :-** | 1) सोनू उर्फ राम भगवान सारवाण, वय-32, रा.गुरुनानक नगर शनिपेठ जळगांव.<br>2) शेख रहेमान शेख निसार, वय-33,रा.बिल्डींग नं. 7 रुम नं. 48,पिंप्राळा हुडको जळगांव<br>3) सचिन उर्फ मंगेश सुर्यकांत झांबरे, वय- 38,रा.गट नं. 78, प्लॉट नं. 1 शारदा आश्रम शाळे जवळ कोल्हे नगर जळगांव.<br>4) दशरथ सुरेश चौधरी,वय-36, रा.गणपती मंदिराजवळ,खंडेराव नगर,पिंप्राळा जळगांव. |
| **आरोपी अभिलेख :-** | आरोपी क्र. 1 याचा गुन्हे अभिलेख.<br>➢ जळगांव शहर पो.स्टे. 119/2012, भादंविक. 324, 323, 504, 506, 34 प्रमाणे.<br>➢ भुसावळ लोहमार्ग पो.स्टे. 157/2013, भादंविक. 353, 332 प्रमाणे<br>➢ जळगांव शहर पो.स्टे. 146/2013, भादंविक. 395 वगैरे<br>➢ शनिपेठ पो.स्टे. 13/2014, भादंविक. 143, 147 वगेरे<br>➢ जळगांव शहर पो.स्टे. 22/2018, भादंविक. 326, 504, 506 प्रमाणे.<br>➢ शनिपेठ पो.स्टे. 14/2024, भादंविक. 380, 457 प्रमाणे.<br>➢ शनिपेठ पो.स्टे. 116/2024, भादंविक. 395, 457 प्रमाणे. |

| जप्त मुद्देमाल :- | 25,00,000/- रुपये रोख 500 रुपये दराच्या नोटा. |
|---|---|
| | 05,00,000/- रु.कि.ची मारोती डिझायर कार क्र.MH-47-C-7877 गुन्हयात वापरलेली. |
| | 30,00,000/- रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत |

-: गुन्हयाची थोडक्यात हकिगत :-

दि.11/07/2026 रोजी सायंकाळी 18.30 वाजता नितीन पुरुषोत्तम वाणी, रा.कासार गल्ली पारोळा जि.जळगांव हे प्रफुल्ल भागचंद सुराणा (जैन) रा.सराफ बाजार जळगांव यांचकडेस 15 वर्षा पासून खाजगी कुरीयरचे काम करतात. प्रफुल्ल सुराणा यांचे जळगांव सराफ बाजारात सोने-चांदीची पेढी असून सदर पेढीसाठी कोल्हापुर येथून चांदीची खरेदी करण्यासाठी दि.11/07/2026 रोजी सायंकाळी 18.00 वाजता. नेरी नाका जळगांव येथून हेरे कृष्णा ट्रॅव्हल्सने कोल्हापुर येथे जाण्यासाठी निघाले होते. जातांना चांदी खरेदीसाठी 25,00,000/- रुपये रोख रक्कम असलेली बॅग सोबत नेली होती. सदरची ट्रव्हल बस हि 20.30 वाजता हॉटेल साई सुरुची लॉजिंग अॅन्ड रेस्टॉरंट फर्दापुर जि.छत्रपती संभाजी नगर येथे जेवणासाठी थांबली असता नितीन वाणी हे जेवणासाठी हॉटेल मध्ये गेले होते. सदर पेसे असलेली बॅग हि लक्झरी बस मध्ये ठेवली होती. त्यानंतर ते जेवण करुन परत आले असता त्यांना सदरची बॅग हि मिळून आली नव्हती, म्हणून त्यांनी सदर घटनेची माहिती सराफ पेढीचे मालक प्रफुल्ल सुराणा यांना दिली होती. या दरम्यान प्रवाशाना उशिर होत असल्याने लक्झरी चालक हा लक्झरी बस घेवून पुढील प्रवासा करता निघून गेला होता. सदर बॅगेचा शोध घेवून ती मिळून न आल्याने अज्ञात इसमा विरुध्द बॅग चोरुन नेली म्हणून गुन्हा दाखल करण्यात आला होता.

-: पोलीस कारवाई आणि तपास:-

सदर सोने-चांदीचे व्यापारी यांची व्यापारासाठी असलेली रक्कम हि लक्झरी बस मधून कोणीतरी चोरुन नेल्यामुळे सदर गुन्हा उघडकीस आणणे बाबत पोलीस अधीक्षक मा.श्री.श्रीकांत धिवरे सो ा. यांचे आदेश होते. त्याप्रमाणे सदर गुन्हयाचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडून सुरु होता. त्या दरम्यान सदरचा गुन्हा रेकॉर्ड वरील सराईत गुन्हेगार 1) **सोनू उर्फ राम भगवान सारवान वय-32, रा.गुरुनानक नगर शनिपेठ जळगांव** याने केले असल्या बाबतची गोपनिय माहिती मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.राहुल गायकवाड यांना मिळाली होती म्हणून आज स्थानिक गुन्हे शाखा,पथकाने सोनू सारवान यास ताब्यात घेवून चौकशी करता त्याने सदरचा गुन्हा केल्याचे कबुल करुन सदर गुन्हयात त्याचे सोबत त्याचे असलेल्या इतर तीन साथीदारांचे नावे सांगितले त्याप्रमाणे 2) **शेख रहेमान शेख निसार,वय-33,रा.बिल्डींग नं.7 रुम नं.48,पिंप्राळा हुडको जळगांव, 3)सचिन उर्फ मंगेश सुर्यकांत झांबरे,वय-38,रा.गट नं.78, प्लॉट नं. 1 शारदा आश्रम शाळे जवळ कोल्हे नगर जळगांव, 4)दशरथ सुरेश चौधरी,वय-36, रा.गणपती मंदिराजवळ,खंडेराव नगर,पिंप्राळा जळगांव** यांना ताब्यात घेतले होते. सर्वांनी सदर गुन्हा केल्याची कबुली दिली होती. यापैकी शेख रहेमान याने सदर गुन्हा करण्यासाठी त्याच्याजवळ असलेली मारोती डिझायर कार क्र.MH-47-C-7877 हि उपलब्ध करुन दिली होती. सदर आरोपीतांनी चोरी केलेली 25,00,000/- रुपये हस्तगत करण्यात आलेली आहे. सदर आरोपी मा ा यांना पुढील कारवाईकामी एमआयडीसी पो.स्टे. यांचे ताब्यात देण्यात आले असून सदर गुन्हयाचा एमआयडीसी पो.स्टे. हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव.**




स्था.गु.शा.जळगांव
एम.आय.डी.सी.पो.स्टे.
00/2026, भा.न्या.सं.क.
305(क) प्रमाणे.